**पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम**

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.

कार्यालय दूरध्वनी क्र. – ०७२५२-२३४८२४

ई-मेल :- sp.washim@mahapolice.gov.in

वेबसाईट :- www.washimpolice.gov.in


**• प्रेस नोट •** दि.१२.०३.२०२२

## वाशिम शहरात जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद करुन ४ गुन्हयाची उकल करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश.

मा. पोलीस अधिक्षक सो श्री.बच्चन सिंह यांनी गुन्हे गारी प्रवृत्तीला आळा बसावा याकरीता दिवसा/रात्री गस्त वाढवुन पोलीसांचा गुन्हेगारांवर असलेला वचक कायम ठेवला आहे. दिनांक १०/०३/२०२२ रोजी वाशिम शहरात १) कु. अक्षरा प्रशांत तोडकर हि तिचे घराबाहेर मोबाईलवर बोलत असताना बाईक वरुन जात असलेल्या दोन इसमापैकी मागे बसलेल्या एका इसमाने तिच्या हातातील मोबाईल जबरीने चोरुन नेला २) विठठल अर्जुन धोरात वय ३० वर्षे हे पोस्ट ऑफीस चौकातुन बस स्टॅन्ड कडे मोबाईलवर बोलत जात असताना मो/सा वरुन मागुन येऊन हातातुन मोबाईल हिसकावुन घेतला ३) कृष्णा गजानन पारेकर वय २५ वर्षे रिसोड नाका ते पाटणी कमर्शीयल येथे मोबाईल वर बोलत जात असताना मो/सा वरुन मागुन येऊन मोबाईल हिसकावुन घेऊन गेले. सदर बाबत पोस्टे वाशिम शहर येथे कलम ३९२ भादवी प्रमाणे अपक्र १९०/२२,१९१/२२,१९२/२२ असे तिन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मा. पोलीस अधिक्षक यांनी आदेश दिल्याने पोनि स्थागुशा यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक तयार करुन मिळालेल्या गोपनिय माहिती वरुन आरोपीचा शोध घेत असताना आरोपी नामे आकाश भारत रोकडे रा झाकल वाडी ता जि वाशिम याला ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी त्याचे दोन साथिदार नामे गोलु उर्फ दिपक सुनिल खिल्लारे, वय १९ वर्षे रा क्रांतीनगर वाशिम संघपाल भारत कांबळे रा भिमनगर यांचे गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांचे ताब्यातुन गुन्हयात चोरीस गेलेले एकुण ५ मोबाईल एकुण ५०,०००/– १शाईन व १पल्सर मोटार सायकल अशा २ मोटार सायकल एकुण १,००,०००/– असा अंदाजे एकुण १,५०,०००/–चा माल ताब्यात घेण्यात आले असुन वरील तिन्ही गुन्हे उघडकीस आले आहेत. नमुद आरोपी यांना पुढील तपासाकरीता वाशिम शहर पोलीस यांचे ताब्यात देण्यात आले.

तसेच दिनांक २७/०२/२०२२ रोजी पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे फिर्यादी यश अनिल सरकटे रा.वाशिम यांचे डोळयात चटणी पावडर फेकुन मारहाण करून फिर्यादीचा १,७५,००००/–रू चा डिजीटल फोटो कॅमेरा व एक मोबाईल किमत अंदाजे २०,०००/– रू चा असा एकुण १,९५,००००/– रू चा मुददेमाल जबरीने चोरून नेणाऱ्या तिन विधीसघर्षग्रस्त बालकांच्या ताब्यातुन गुन्हयात चोरुन नेलेला कॅमेरा आणि मोबाईल १,९५,००००/– रू चा मुददेमाल तसेच गुन्हयात वापरलेली मोटार सायकल किंमत ५०,०००/– असा एकुण २,४५,००००/– जप्त करुन पोस्टे वाशिम शहर ला अप.क्र.१४९/२०२२ कलम ३९४ भादंवि हा गुन्हा उघडकीस आणला आहे. एकुण ५ गुन्हयात ३,९५,०००/– चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक श्री बच्चनसिंह साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री.भामरे साहेब, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक,श्री सोमनाथ जाधव स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांचे पथकातील सपोनि अतुल मोहनकर, विजय जाधव,पोहेकॉ सुनिल पवार,संतोष कंकाळ,किशोर चिंचोळकर,दिपक सोनवणे,गजानन अवगळे,पोना अमोल इंगोले,प्रशांत राजगुरु,राजेश राठोड,राजेश गिरी,गजानन गोटे,पोकॉ संतोष शेणकुडे,शुभम चौधरी,किशोर खडारे,निलेश इंगळे महीला पोलीस पुजा पडवाळ,पोहेकॉ चालक मिलिंद गायकवाड, सायबर सेल येथील पोकॉ प्रशांत चौधरी, गोपाल चौधरी यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक

**स्थानिक गुन्हे शाखा वाशिम**




महाराष्ट्र पोलीस
वाशिम